




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २४१ •रविवार,दि.२० नोव्हेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


# अजित पवार शब्दाचा पक्का आहे मी करून दाखवतो

## एकवेळ मला संधी द्या : ना. अजितदादा पवार

### राष्ट्रवादी आणि मित्रपक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बीडच्या बशीरगंजमध्ये विराट जाहिर सभा

**बीड । प्रतिनिधी**

मी तुम्हाला समजून सांगायला आलोय, तुम्हाला ऐकायचे असेल तर ऐका, मी बारामतीत करून दाखवले आहे, मी पिंपरी चिंचवडमध्ये करून दाखवले आहे ते मला बीडमध्ये करायचे आहे. तुमची साथ असेल तर मी बीडमध्ये विकास करून दाखवेन, हा अजित पवारचा शब्द आहे आणि मी शब्दाला पक्का आहे, मी करून दाखवतो, मला फक्त संधी द्या. इथल्या सत्ताधाऱ्यांनी ३५ वर्षे आपल्या लोकांना वाऱ्यावर सोडून इथले मुलभूत प्रश्न रखडत ठेवले, आत्मपरिक्षण करा, डोळे उघडा, आता चांगली संधी आलेली आहे. माझ्या





**● ना. अजितदादा पवार यांच्या माजलगाव, धारुर येथील जाहिर सभा झाल्यानंतर त्यांनी बशीरगंज चौकात जाहिर सभेच्या ठिकाणी आगमन होताच लगेच भाषणाला सुरुवात केली. आपल्या भाषणात त्यांनी बीडमध्ये काय करायचे आहे याचा विकास आराखडाच मांडला. त्यांच्या या सभेला महिला, पुरुष मतदार व कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती. सभास्थळी मिळालेला उत्स्फुर्त प्रतिसाद आणि उत्साह राष्ट्रवादी आणि मित्रपक्षाच्या सर्व उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाला आहे.**

विचाराच्या माणसाला निवडून द्या, काळजी करू नका स्वतः उभे आहात असे समजून सद्सद् विवेक बुध्दीने मतदान करून मला बीडचा चेहरा-मोहरा बदलण्याची संधी मला द्या असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना-शिवसंग्राम-सपा व मित्रपक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या जाहिर सभेत ते बोलत होते. यावेळी विराट संख्येने उपस्थिती असल्यामुळे राष्ट्रवादी व मित्रपक्षांच्या उमेदवारांचा विजय निश्चित झाला आहे. बीड नगर परिषद निवडणुकीतील ▶ उर्वरित पान २ वर

...यांना आरोपीची आठवण येते, संतोष देशमुखांच्या लेकरांना बापाची आठवण येत नसेल का ?

## मनोज जरांगेंचा धनंजय मुंडेंवर हल्लाबोल

**मस्साजोग । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येला आज एक वर्षे पूर्ण झाले. मस्साजोगमध्ये आज श्रद्धांजली वाहण्यासाठी राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर लोकप्रतिनिधी आणि नागरिक उपस्थित होते. आरोपींना फासावर लटकविल्याशिवाय संतोष देशमुख यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली




मिळणार नाही. निर्लज्ज लोकांना आरोपींची आठवण येते, संतोष देशमुखांच्या लेकरांना आपल्या बापाची आठवण येत नसेल का ? तुम्ही खचू नका, देशमुख कुटुंब खचले तर गाव खचेल, राज्यातला तरूण खचेल, मराठा समाज कायम तुमच्या पाठिशी आहे. हा लढा शेवटपर्यंत तेवत ठेवायचा आहे ▶ उर्वरित पान २ वर

## वर्ष संपलं, अश्रु थांबेनात! वैभवी देशमुख रडली, वडिलांच्या पुण्यतिथीला मोठा निर्धार

**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्राला हादरवणाऱ्या, मरणालाही भय वाटेल, अशा मस्सजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाला आज एक वर्ष पूर्ण झाले. ९ डिसेंबर २०२४ रोजी सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण



हत्या करण्यात आली. या हत्येने अवघ्या महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. ▶ उर्वरित पान २ वर

**वडिलांच्या हत्येला १ वर्ष झाले तरी आजही आम्ही न्यायाच्या अपेक्षेत आहोत. आरोपी आहेत, सर्व पुरावे आहेत तरीही या खटल्यात उशिर का होत आहे ? हे समजत नाही. आमची सरकारला विनंती आहे की लवकरात लवकर न्याय मिळवून द्यावा. समाजाने दिलेली साथ यामुळेच हा लढा उभा राहिला. आठवणींना कोणताही दिवस नसतो. मी त्यांचं डॉक्टर होण्याचं स्वप्न नक्की पूर्ण करेन, पण ते माझ्यासोबत नसतील, याचं वाईट वाटतं. असं म्हणत वैभवी देशमुखलाही अश्रु अनावर झाले.**

## केजजवळ पहाटे एसपींच्या गाडीचा अपघात



**बीड । प्रतिनिधी**

येथील पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या गाडीचा अपघात झाल्याची घटना पहाटे ३ ते ३.३० च्या सुमारास घडली आहे.सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती आहे. केजजवळ एका पोलवर गाडी धडकल्याने ही घटना घडल्याचे सांगितले जाते. रात्री पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत परळीच्या विद्यानगर भागात गोळीबार झाल्यामुळे तातडीने गेले होते.रात्री उशिरा परळीवरून वापस येताना गाडी वेगात असल्याने केजजवळ एका पोलवर धडकली.यावेळी कारमधील सवारनी सीट बेल्ट लावल्यामुळे मोठा अनर्थ टळला.या अपघातात गाडीचे काही नुकसान झाले असून कोणतीही जीवितहानी मात्र झाली नाही.मिळालेल्या माहितीनुसार पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्यासोबत आरटीपीसी गणेश थापाडे, चालक राहेकोल आणि क्यूआरटीचे पथक देखील सोबत असल्याचे कळते.अपघाताची घटना कळल्यानंतर पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी काळजी करण्याचे कारण नाही अशी प्रतिक्रिया देत मी आणि माझी टीम सुखरूप असल्याचे सांगितले.

## आरक्षणाच्या तिढ्यामुळे जि.प. निवडणुका दोन टप्प्यात होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद निवडणुका २ टप्प्यात होण्याची शक्यता आहे. ५० टक्क्यांच्या आत आरक्षण असलेल्या १५ जिल्हा परिषदांमध्ये आधी निवडणुका होतील. तर ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडलेल्या १७ जिल्हा परिषदांमध्ये दुसऱ्या टप्प्यात निवडणूक घेण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण असलेल्या १७




जिल्हा परिषदांमध्ये नव्यानं सोडत काढण्यात येणार असल्याची माहिती आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निवडणुकांबाबत सुप्रीम कोर्टाने मोठा निर्णय दिला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर कोणत्याही प्रकारची स्थगिती नाही. निवडणुका दिलेल्या वेळेत होतील, ▶ उर्वरित पान २ वर

## 'प्रियकर मृत्यूनंतरही जिंकला'; कुटुंबाकडून हत्या, तरुणीने बॉडीसोबतच केलं लग्न; त्यालाही हळद लावली अन्...;

**नांदेड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात आंतरजातीय प्रेमप्रकरणातून होणाऱ्या हिंसक घटना अजूनही थांबायचं नाव घेत नाही. अशीच राज्याला हादरवणारी आणखी एक घटना राज्यातील नांदेड जिल्ह्यात घडली असून मुलीशी प्रेमसंबंध ठेवणाऱ्या तरुणाचा वडिलांसह भावांनी मिळून खून केला आहे. नांदेड शहरातील जुना गंज भागातील घटना- प्रेमसंबंधांना मुलीच्या घरच्यांचा तीव्र विरोध असल्याने सक्षम ताटे या तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली. गुरुवारी सायंकाळी नांदेड शहरातील जुना गंज भागात ही थरारक घटना घडली. प्रेमसंबंधांना विरोध असणाऱ्या मुलीच्या वडिलांनी, भावांनी आणि त्यांच्या साथीदारांनी मिळून सक्षम ताटे याला आधी गोळी झाडली आणि नंतर फरशीने डोक्यात मारून



त्याची हत्या केली. सक्षम आणि आचल यांच्यात तीन वर्षांपासून प्रेमसंबंध होते. दोघांनी एकत्र आयुष्य घालवण्याची स्वप्ने पाहिली होती. मात्र, त्यांच्या प्रेमाची कुणकुण आचलच्या कुटुंबाला लागली. सक्षम हा आचलच्या भावाचा मित्र असल्याने तो घरी येत-जात असे. मुलीच्या भावाने ▶ उर्वरित पान २ वर

## ऊस दर वाढीसाठी शेतकरी आंदोलन पेटले; कारखान्यांचे गाळप ठप्प

**बीड । प्रतिनिधी**

ऊसदर वाढवून देण्याच्या मागणीसाठी बीड सह परभणी जिल्ह्यात शेतकरी आंदोलने होत असून, शनिवारी पाथरीमध्ये रास्तारोको तर आंदोलनाला पाठिंबा म्हणून ऊसतोड कामगारांनी कोयता बंद ठेवला असून, वाहनधारकांनी वाहतूक करण्यास नकार दिल्याने हंगामाच्या नमनालाच अनेक साखर कारखाने बंद ठेवण्याची वेळ आली आहे.

परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यातील असंख्य गावातील शेतकरी यांनी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीला पाठींबा



देत शेतकऱ्यांनी आपली ऊस तोड व ऊस वाहतूक थांबवली आहे. यातच ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने समितीत सामील होऊल पेक्षा अधिक वाहनाद्वारे जिल्ह्यातील सर्वच साखर कारखानदारांना भेटी देत आपल्या मागण्याचे निवेदन दिले. ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखानदार यांच्याशी जिल्हाधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत कारखानदारांनी कोणतीही सकारात्मक भूमिका न घेतल्यामुळे ही चर्चा निष्फळ ठरली. ऊस दर बाबत ▶ उर्वरित पान २ वर






## बीड जिल्ह्यात 'टक्केवारी'मुळे विकासकामांची गुणवत्ता घसरली

### योजनांमध्ये कामांपेक्षा टक्केवारीला अधिक प्राधान्य : डॉ. गणेश ढवळे , रामनाथ खोड



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विविध शासकीय योजना, विकासकामे आणि ठेकेदारी प्रकल्पांमध्ये 'टक्केवारी' प्रथेचे सावट दिवसेंदिवस गडद होत असून, त्याचा थेट परिणाम विकासकामांच्या गुणवत्तेवर होत असल्याचे गंभीर चित्र पुढे आले आहे. सरकारी निधीतील कोणतेही काम टक्केवारीशिवाय होत नाही अशी उघड प्रथा निर्माण झाल्याने निकृष्ट कामे, अपूर्ण प्रकल्प, आणि सार्वजनिक पैशांचा अपव्यय मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर व रामनाथ खोड यांनी केला आहे. या संदर्भात पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे ▶ उर्वरित पान २ वर




# मराठवाड्याच्या मातीतून जन्मतोय शाश्वत विकासाचा नवांकुर

## जलनायक मयंक गांधींच्या ग्रामीण क्षेत्रातील कार्याचा राष्ट्रीय पातळीवर गौरव; इंडिया लीडरशिप कॉन्क्लेव्ह पुरस्काराने सन्मान

भारताच्या ग्रामीण वास्तवाचा त्यातल्या त्यात महाराष्ट्र आणि मराठवाड्याचा विचार करताना सर्वप्रथम मनात येतात त्या कोरड्या विहिरी, अर्धवट पिके, स्थलांतराच्या विवश कहाण्या आणि कर्जाचे पाश. या वास्तवाला अनेकांनी पाहिले, अभ्यासले, त्यावर लेख लिहिले, धोरणे बनवली. परंतु काही व्यक्ती असे असतात, ज्या समस्यांकडे पाहण्यात वेळ घालवत नाहीत तर त्या स्वतःच उपाय बनतात. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी हे त्या विरळ व्यक्तिमत्वांपैकी एक आहेत. मुंबईत नुकत्याच पार पडलेल्या India Leadership Conclave 2025 मध्ये त्यांच्या ग्रामीण क्षेत्रातील कार्याचा राष्ट्रीय पातळीवर गौरव करण्यात आला. हा पुरस्कार म्हणजे केवळ सन्मानपत्र नाही तर तो ग्रामीण भारताच्या बदलत्या वास्तवाचा एक ठोस पुरावा आहे.

शहरी नियोजन आणि सामाजिक चळवळीतील दीर्घ अनुभव असलेले मयंक गांधी शहरांतील सुख - सुविधा, आरामदायी जीवन आणि व्यापक संधी यांना सोडून ग्रामीण भारताच्या मातीमध्ये उतरले, तेव्हा ती त्यांची असामान्य निवड होती. पण त्यांच्या याच निवडीने ग्रामीण भागाला पायाभूत विकासाची नवी दिशा दिली. बीड जिल्ह्यातील परळीसारख्या शेतीचा शाश्वत विकास आणि आधुनिकतेच्या बाबतीत कमालीच्या पिछाडीवर असलेल्या तालुक्यातील गावोगावी फिरताना त्यांनी पाहिलेले वास्तव वाळवंटासारखे कोरडे आणि हृदयद्रावक होते. विहिरींच्या तळाशी पोचणारा हात, हतबल शेतकरी, आणि पाण्याविना मृतप्राय शेती. त्यांनी ओळखले की ग्रामीण भारताचा सर्वात मोठा प्रश्न हा कोणतेही धोरण किंवा निधी नव्हे तर तो आहे पाणी. आणि म्हणूनच त्यांच्या नेतृत्वाखाली हजारो हात एकत्र आले. नद्या खोल करण्यात आल्या, ओढ्यांचे पुनरुज्जीवन झाले, गाळ काढून जलसाठ्यांची क्षमता वाढवण्यात आली. जलसंधारणाच्या चळवळीने मातीला पुन्हा जीवन दिले.

आज ज्या गावांत विहिरी कोरड्या पडल्या होत्या, तिथे पुन्हा नव्याने जलसमृद्धी प्रस्थापित झालेली पहायला मिळेल. हा चमत्कार नाही तर ही आहे ठोस नियोजन, लोकसहभाग, कार्यसातत्य याची त्रिसूत्री. पाणी मिळाल्यावर पुढचा टप्पा होता उत्पन्न वाढवणे. जलनायक मयंक गांधींची दूरदृष्टी इथेही अविश्वसनीयपणे साधी पण प्रभावी होती. त्यांनी शेतकऱ्यांच्या हातात दीर्घकालीन, उच्च व शाश्वत उत्पन्न देणारा मार्ग दिला तो म्हणजे फळझाडांची शेती. आज केळी, पपई, आंबा, लिंबू, पेरू, डाळिंब आदी फळझाडांची तब्बल 7 कोटींपेक्षा जास्त लागवड करण्यात आली आहे. 29 हजारांपेक्षा जास्त शेतकरी ग्लोबल विकास ट्रस्ट या सामाजिक संस्थेशी जोडले गेले असून, फळबाग लागवडीसारख्या शाश्वत शेतीच्या माध्यमातून 5 हजार पेक्षा जास्त गावांनी आर्थिक समृद्धीच्या दिशेने नवे पाऊल ठेवले आहे. ज्यातून शेकडो कुटुंबांचे उत्पन्न दुप्पट, चौपट, काही ठिकाणी दहापट वाढले आहे. याचाच अर्थ असा होतो की मयंक गांधी यांच्या दूरदृष्टीने ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवा पुनर्जन्मच दिला आहे.

ग्लोबल विकास ट्रस्टने विकसित केलेले मॉडेल अत्यंत प्रभावशाली आणि देशभरात राबवता येईल अशा स्वरूपाचे ठरले. केंद्रीय कृषीमंत्री श्री.शिवराज सिंह चौहान यांनी याच वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यात ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शेतकरी प्रशिक्षण केंद्राला भेट दिली. ही केवळ भेट नव्हती तर तो एक अवलोकन दौरा होता. सिरसाळा येथील कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्राचे काम त्यांनी पाहिले, शेतकऱ्यांना उच्चांकी उत्पन्न देऊ शकणाऱ्या फळबाग लागवडीच्या तंत्रज्ञानावर त्यांनी चर्चा केली. मराठवाडा विभागाची भौगोलिक, सामाजिक संरचना आणि शेतकऱ्यांचा शाश्वत विकास यावर आधारित ग्लोबल विकास ट्रस्टच्या मॉडेलला देशभरात राबवण्याचा मनोदय व्यक्त करत केंद्र सरकार, राज्य सरकार आणि ग्लोबल विकास ट्रस्ट आगामी काळात एकत्र काम करेल याची त्यांनी ग्वाही दिली.

ग्लोबल विकास ट्रस्टने उभारलेल्या मॉडेलवर लोकांनी काम केले, लोकांनी बदल घडवला, आणि लोकच त्या बदलाचे मानकरी ठरले. India Leadership Conclave पुरस्कार हा त्या कार्याचा राष्ट्रीय शिक्का आहे. हा सन्मान एका व्यक्तीचा नाही तर तो त्या हजारो कुटुंबांचा आहे, ज्यांच्याकडे आज मुबलक पाणी आणि फळझाडांची हिरवाई उद्यासाठीच्या आशेचा मंत्र बनून आली आहे. विकास निधीने होत नाही, भाषणांनी तर अजिबात होत नाही. विकास तेंव्हा घडतो जेव्हा एखादे व्यक्तिमत्व गावाच्या मातीवर बसून तिच्या काळजातील आवाज ऐकते आणि त्याला दिशा देते. आज ग्रामीण भारत बदलत आहे, बदलाचा वेग वाढत आहे आणि त्या बदलाच्या केंद्रस्थानी उभे आहे एक शांत, अभ्यासू, संयमी परंतु ध्येयवेडे व्यक्तिमत्व जलनायक मयंक गांधी.

शहरात जन्म घेऊन त्याच शहरी संस्कृतीत वाढलेल्या व्यक्तिमत्वाने ग्रामीण भागात येऊन शेती - मातीचा अभ्यास करावा, त्यातून नवनव्या संकल्पनांनी जन्म घ्यावा आणि हजारो शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनाला कलाटणी देणारा तो ठरावा हे सगळेकाही अविश्वसनीय वाटावे असेच आहे. ऐशोआरामाचे जीवन जगता येईल असे सर्वकाही मयंक गांधी यांच्याकडे होते. त्या सर्व ऐश्वर्याचा त्यांनी त्याग केला. देशाला बदलायचे असेल तर त्यासाठी काय केले पाहिजे? याचा त्यांनी शोध घेतला. सोने की चिडिया असलेल्या आपल्या देशाला कायम विकसनशील देश म्हणून लागलेला शिक्का पुसण्याचा त्यांनी निर्धार केला. एकूण अर्थव्यवस्थेपैकी सर्वाधिक वाट उचलणारे क्षेत्र म्हणजे कृषिक्षेत्र आहे. म्हणूनच त्यात सुधारणा झाल्या, पारंपरिक शेती अपारंपारिक आणि शाश्वत झाली तर त्यातून शेतकरी सुधारेल, शेतकरी सुधारला तर देश सुधारेल हा निष्कर्ष त्यांनी काढला आणि त्या दृष्टीने पुढे पाऊले टाकली. काही वर्षांतच त्यांच्या कामाचे परिणाम दिसून आले. टाटा सामाजिक संस्थेने ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामाची परिणामकारता तपासली. त्यात असे दिसून आले की पूर्वी हजारांत उत्पन्न मिळवणारा शेतकरी एकरी लाखांत उत्पन्न मिळवू लागला आहे. तिप्पट, चौपट नव्हे तर दहा पट उत्पन्नात वाढ दिसू लागली. ग्लोबल विकास ट्रस्टचे हेच मॉडेल शेतकऱ्यांना आर्थिक शाश्वत बनवेल, त्यांच्या कुटुंबाला स्थैर्य देईल. सुखी - समृद्ध शेतकरी झाल्याने संपन्न राज्य होईल आणि विकसीत देश म्हणून देशाचा सन्मान केला जाईल हा दृढ विश्वास घेऊन जलनायक मयंक गांधींचे कार्य सुरू आहे. "मी शेतकरी" ही त्यांनी सुरू केलेली चळवळ भविष्यात अधिकाधिक व्यापक होत राहील, ज्यातून सामाजिक ऐक्याची आणि एकोप्याची भावना वृद्धिंगत होईल अशी दृढ आशा आहे.

कृषीकुल; आंतरराष्ट्रीय दर्जाचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र

आपल्या देशात वेगवेगळ्या घटकांसाठीच्या वेगवेगळ्या मुद्द्यावर आवाज उठवणाऱ्या आणि काम करणाऱ्या विविध संघटना, संस्था आहेत. मात्र देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांसाठी कणखरपणे पुढे येऊन त्या काम करतांना दिसून येत नाही. फक्त प्रबोधनाने आणि भाषणांनी सुधारणा होणार नाही तर त्यासाठी प्रत्यक्षात या मातीत पाय रोवून उभारावे लागेल. ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र बीड जिल्ह्यातील सिरसाळा येथे उभारण्यात आले. जेथे शेतकऱ्यांना शेतीतील विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे धडे दिले जातात. फळबाग लागवडीचे केवळ प्रशिक्षण दिले जात नाही तर प्रत्यक्षात लागवडीपासून ते काढणीपर्यंत आवश्यक त्या सर्व पातळीवर संस्थेचे कर्मचारी शेतकऱ्यांच्या बांधावर उभे राहून त्यांना सहकार्य करतात. फळबाग लागवड, सेंद्रिय शेती यासंदर्भात कृषीकुल येथे शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण दिले जाते. आजपर्यंत हजारो शेतकऱ्यांनी येथे भेट देऊन लाभ मिळवला आहे. **-दत्तात्रय काळे - 9558488686**

◆ पान ४ वरून पुढे...

### पंकजाताई मुंडे....

आ. बदामराव पंडित, बाळराजे पवार, माजी आ. लक्ष्मण पवार, सौ. गिरीकाभाभी पंडित, युध्दजित पंडित, शिवराज पवार यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, गेवराई शहराच्या विकासासाठी पवार कुटूंबिय सातत्याने प्रयत्नशिल असते. लक्ष्मण पवार यांनी सतत पाठपुरावा करून पाणी पुरवठा योजना, नाट्यगृह, सिमेंट रस्ते आदी विकास कामे मोठ्या प्रमाणात करून घेतली. मागील पंधरा वर्षात नगर पालिकेचा कारभार पवारांनी कशा पध्दतीने चालविला हे गेवराईकरांनी पाहिले आहे. त्यामुळेच गेवराईचा चेहरा बदलला आहे. गेवराई स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी काही पर्यावरणाचे उपक्रम आपण राबवू त्यासाठी मी स्वत: प्रयत्न करेल तसेच महामार्ग आणि गेवराई शहरात येणाऱ्या रस्त्याचे सुशोभिकरण यासाठी मी स्वत: केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे जावून तो प्रश्न मार्गी लावू तसेच महिला बचत गटातील महिलांच्या उत्पादनांना मार्केट मिळावे त्यासाठी स्वतंत्र इमारत उभी करू, सर्वसामान्य कुटूंबातील महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी आपल्याला काम करायचे आहे त्यामुळे नगर पालिकेच्या निवडणुकीत गिताभाभी पवार यांच्यासह सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले.

### भाजपच्या संध्या....

बैठकांना न जाणे पसंत करीत आहेत. भाजपच्या नियोजनबद्द प्रचार यंत्रणेमुळे उमेदवार संध्या मेंडकेना जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आयुष्यमान भारत योजनेचे ओमप्रकाश शेटे डॉ प्रकाशराव आनंदगावकर यांच्या आक्रमक कॉर्नर बैठकांना जनता पसंती देत आहे. भाजपच्या

◆ पान ४ वरून पुढे...

उच्चशिक्षित सर्वामधे मिसळणाऱ्या उमेदवार संध्या मेंडके यांना जनतेची पसंती मिळत असून तुतारी व घड्याळच्या उमेदवारांना त्यांच्याच नेत्यांच्या एकमेकांवरील जाहीर अश्लील टीकेमुळे जनतेच्या रोषाचा फटका बसू शकतो. भाजपने टक्केवारी व भ्रष्टाचार मुक्त नगरपालिकेची केलेली अपील जनतेच्या पसंतीस उतरली आहे.शहरात ठिकठिकाणी भाजपच्या कॉर्नर बैठकांना उत्तम प्रतिसाद मिळत असून दोन दिवसांवर मतदान असल्याने शहरातील राजकीय वातावरण चांगलेच गरम झाले आहे.

### महिलांच्या सबलीकरणासाठी...

मी स्वत: उभे केले. त्यामुळेच आजपर्यंत महिलांनी आमच्या पवार कुटुंबावर विश्वास टाकला. कठीण परिस्थितीतील आपल्या संघर्षाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले, माझे पती १५ वर्षे तुरुंगात होते. त्या काळात मी दोन मुलांना सांभाळले, घरही पाहिले आणि समाजकारणही प्रामाणिकपणे केले. गेवराईकरांच्या प्रत्येक सुखदु:खात मी धावून गेले. या लोकसंग्रहामुळे आज मी तुमच्यासमोर उभी आहे. म्हणून पुन्हा एकदा पवार कुटुंबाला आपल्या आशीर्वादाची गरज आहे. या भाषणात त्यांनी मनातील वेदनाही व्यक्त केली. आमच्या स्वत:च्या नातेवाईकांनी ज्यांना तुम्ही ‘बीडचे पंडित’ म्हणता त्यांनी आम्हाला खूप त्रास दिला. नातेवाईकांकडून अन्याय सहन करावा लागणे ही मोठी शोकांतिका आहे. पण मी कधीही खचले नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. आजपर्यंत जसे गेवराई करांच्या हितासाठी काम केले तसेच यापुढे ही गेवराईच्या विकासासाठी आम्ही मनापासून काम करू. तुमचे पाठबळच माझी खरी ताकद आहे. म्हणून येत्या २ तारखेला मला आणि भाजपच्या सर्व उमेदवारांना तुमच्या मतदानरूपी आशीर्वादाने सन्मानित करा. गीताभाभींच्या या भावनिक व प्रामाणिक अवाहनाने गेवराईकरांची

◆ पान ४ वरून पुढे...

मने जिंकली असून निवडणुकीच्या तोंडावर भाजपच्या छावणीत नवी ऊर्जा संचारली असून गीताभाभीचा विजय पक्का झाला असल्याचे दिसून येत आहे.

### बाळासाहेब गुंजाळांना....

निवडणुकीत बाळासाहेब गुंजाळ,पायल जाधव या अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाच विकासाचं व्हिजन घेऊन या निवडणुकीत उतरले आहेत. अजित पवार हेच बीडचा विकास करू शकतात आणी याच विकासाची गंगा पेठबीड भागात यावी म्हणून अमरसिहं पंडित आणी आमदार विजयसिहं पंडित यांच्या नेतृत्वात बाळासाहेब गुंजाळ हे विकास् दूत झाले असून या पेठ बीड भागाचा विकास् करायचा असेल तर पायल जाधव आणी बाळासाहेबाना गुलाल लावा असा चंग महिलांनी केला आहे आणी पेठ बीड भागात वॉर्ड क्रमांक २१ ची निवडनुक महिलांनी हाती घेतली आहे. त्यामुळे बाळासाहेब आणी पायल जाधव याचा विजय निश्चित झाला आहे

### बीडचा सामान्य...

चक्रधर नगर, प्रभाग ४ मध्ये भास्कर भारत कांबळे, मंगलाबाई संजय चांदणे यांच्या प्रचारार्थ मातोश्री मंगल कार्यालय, पेठ बीड आणि प्रभाग ३ मध्ये रवी जयमल्हार बागल, राधा आकाश घोरपडे यांच्या प्रचारार्थ विठ्ठल मंदिर चौक पेठ बीड येथे या तीन प्रभागाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आ. संदीप क्षीरसागर यांनी शनिवारी (दि.२९) सायंकाळी कॉर्नर सभा घेऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी मतदारांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती असल्याने बीडच्या मतदारांच्या मनात तुतारी अन् मशालच असल्याचे चित्र दिसून येत आहे. यावेळी बोलताना आ. संदीप क्षीरसागर म्हणाले की, मी आणि माजी आ.सय्यद सलीम आम्ही सातत्याने रस्त्यावर उतरून काम करतो.

◆ पान ४ वरून पुढे...

लोकांच्या अडीअडचणी जाणतो, त्या सोडविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे बीडचा सामान्य मतदार आमच्या सोबत आहे. त्यामुळे या नगरपरिषद निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मिताताई विष्णू वाघमारे यांच्यासह सर्व उमेदवार निवडून येणार हे निश्चित आहे. सर्वसामान्य लोकांच्या आशिर्वादाने विजयाची तुतारी वाजणारच असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला. यावेळी माजी आ. सय्यद सलीम, राजेंद्र मस्के, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे व नगरसेवक पदाचे उमेदवार आणि मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गेवराई शहरातील...

घड्याळा चिन्हावर बटन दाबून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितल महेश दाभाडे यांच्यासह या प्रभागातील उमेदवार सौ. गंगासागर विठ्ठल पवार व भास्कर भिकाजी काकडे यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. या कॉर्नर बैठकीला महाडा कॉलनी, संजयनगर, नाईक नगर, भगवान नगर शिवाजीनगर येथील नागरिक तसेच सावता परिषदेचे गेवराई तालुका अध्यक्ष दादासाहेब चौधरी ड. एच.एस पाटील, डॉ विष्णू वादे, पप्पू चोरमले, विकास धुरंदरे, पवन सोळुंके, राजेंद्र कांबळे, नितीन लोखंडे, सोमीनाथ शिंदे, लखन कांबळे, आदर्श तूरूरुकमारे, विकास अंगद काळे, गोकुळ साईनाथ खंडागळे, महेश शिंदे, स्वप्निल मस्के, समाधान मस्के, प्रदीप केशर, अशोक घुले, निखिल जंगले, बाबुराव बेद्रे सोमीनाथ गिरगे, ओम धापसे, निखिल जंगले, विशाल हूंबे, स्वप्निल वाडकर, महेश पंडित, विशाल जाधव, राम दादा बेदरे, अभिषेक तौर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆ पान ९ वरून पुढे...

### एकवेळ मला...

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शिवसेना-शिवसंग्राम-सपा मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह नगरसेवक पदाच्या ५२ उमेदवारांच्या प्रचारार्थ ना.अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील बशीरगंज चौक येथे जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजीमंत्री नवाब मलिक, आ. विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निरीक्षक संजय दौड, शिवसंग्रामच्या राष्ट्रीय नेत्या श्रीमती ज्योतीताई मेटे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख अनिल जगताप, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे, अल्पसंख्यांक आघाडीचे शेख निजाम, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, तालुकाध्यक्ष राजेंद्र राऊत, माजी नगरसेवक फारुक पटेल, राष्ट्रवादीच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ.प्रज्ञाताई खोसरे, राष्ट्रवादीच्या युवती अध्यक्षा प्रिया डोईफोडे, रेखा फड, माजी नगराध्यक्ष मोईन मास्टर, दिलीप गोरे, झुंजार धांडे, सुहास पाटील, भागवत तावरे, पांडुरंग आवारे, सुनिल मगरे, गोरक्ष लोखंडे यांच्यासह नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे तसेच सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना ना. अजितदादा पवार म्हणाले की, बीड शहरात अनेक प्रश्न रखडत पडलेले आहेत. रस्ते नाहीत, नाल्या नाहीत, रस्त्याच्या मधोमध विद्युत खांब आहेत, मुला-मुलींना खेळण्यासाठी क्रीडांगण नाही, उद्यान नाही, आलेला निधी खर्च केलेला नाही, रस्त्याच्या बाजूला झाडे लावलेली नाहीत असे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. विरोधकांनी ३५ वर्षे बीडची अवस्था बकाल करून टाकली, बारामती, पिंपरी चिंचवडचा विकास होवू शकतो मग बीडचा का नाही होवू शकत नाही ? असा प्रश्न उपस्थत करून तिकडे व्हिजन असणारे लोक आहेत आणि इकडे लोकांना वाऱ्यावर सोडून स्वत: चे घर भरणारे लोक असल्यामुळे आपली अवस्था अशी झालेली आहे. या भागातील खासदार झाले, आमदार झाले यांनी आत्तापर्यंत काय केले ? झोपा काढल्या का ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ज्ञानराधा, साईराम, माँसाहेब आणि छत्रपती अशा पतसंस्थांच्या कुटे, परभणे, शिंदे आणि भंडारी या लोकांनी सामान्य लोकांचा पैसा लुटला. त्यातल्या तिघांना आम्ही जेलमध्ये पाठवले, एक फरार आहे. चुकीला माफी नाही, काम करत असताना काही कठोर निर्णय घ्यावे लागतील तेंव्हा सुधारणा होतील आणि सुधारणा करण्यासाठी आपल्या विचाराची माणसं नगर परिषदेत पाठवावी लागतील. तुम्ही कचरा निर्माण करणाऱ्या माणसाला निवडून द्याल तर या बीडचा कचरा होईल स्वच्छता करणाऱ्या स्वच्छ विचाराच्या माझ्या माणसांना विजयी करा असे सांगून हावसे-नवसे-गवसे येतील, रात्रीतून गडबड करतील त्यांच्या भुलथापांना बळी पडू नका, येणाऱ्या २ तारखेला घडी आणि धनुष्यबाण या चिन्हासमोरचे बटन दाबून मला काम करण्याची संधी द्या असे कळकळीचे आवाहन ना. अजितदादा पवार यांनी केले. यावेळी बोलताना माजीमंत्री नवाब मलिक म्हणाले की, ही निवडणुक बीडचे भविष्य बदलणारी निवडणुक आहे, मनात किंतु-परंतु न ठेवता, प्रशासकीय अनुभव असणाऱ्या प्रेमलता पारवे यांच्यासह मित्रपक्षाचे सर्वच्या सर्व उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी करा. ना. अजितदादा पवार यांच्यासारखा विकास पुरुष आपल्या पाठिशी आहे, त्यांच्या माध्यमातून बीडची बारामती करा, सर्व धर्म समभाव विचार घेऊन आम्ही, सर्व जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम करत आहोत, तेंव्हा आपल्या विचाराची माणसं सत्तेत पाठवा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी बोलताना डॉ.ज्यातीताई मेटे म्हणाल्या की, विरोधकाने नगर पालिकेचा

◆ पान ९ वरून पुढे...

वापर स्वार्थी राजकारण करण्यासाठी केला, अटल अमृत योजनेचा निधी कुठे गेला ? याचा जबाब तुम्ही त्यांना विचारला पाहिजे. विकासाचा ताळेबंद घेऊन चर्चा करा, बीड नगर परिषदेमध्ये परिवर्तन करण्याची संधी चालून आलेली आहे. त्यासाठी घड्याळ चिन्हासमोरचे बटन दाबून सर्व उमेदवारांना विजय करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी दिलीप गोरे व भागवत तावरे यांनीही मनोगत व्यक्त केले. तसेच सतिष क्षीरसागर, गौतम मोरे, आरेफ खान, फेरोज खान यांनी ना. अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश केला.

### ...यांना आरोपीची ...

असा निर्धार मनोज जरांगे पाटील यांनी श्रद्धांजली वाहताना व्यक्त केला. संपूर्ण महाराष्ट्र हादरवणाऱ्या संतोष देशमुख हत्याकांडाला आज वर्ष पूर्ण झाले. वर्षभराच्या प्रदीर्घ कालावधीनंतरही मस्साजोगचा न्यायाचा लढा संपला नाही. देशमुख कुटुंबियांनीसंतोष देशमुख यांच्या स्मरणार्थ मस्साजोग येथे किर्तनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी मनोज जरांगे पाटील, विधान परिषदेचे माजी सभापती अंबादास दानवे, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह विविध पक्षाचे नेते उपस्थित होते. यावेळी मनोज जरांगे पाटील म्हणाले, आरोपींना फाशी मिळाल्याशिवाय संतोष देशमुख यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली नाही. मी मराठ्यांच्या पोरांना सांगू इच्छितो हे युग संस्काराचे राहिले नाही. जशाला तसे वागले पाहिजे. संतोष देशमुख यांची हत्या कायम डोळ्यासमोर ठेवा. आज पूर्ण महाराष्ट्र मस्साजोगवासियांच्या पाठिशी खंबीरपणे उभा आहे. आरोपीला पाठिशी घालणाऱ्या धनंजय मुंडेंची जिरवल्याशिवाय मराठा समाज स्वस्थ बसणार नाही. गुन्हेगारांचे समर्थन करणे हा निर्लज्जपणाच आहे. यांना आरोपीचे आठवण येते, संतोष देशमुखांच्या लेकरांना बापाची आठवण येत नसेल का? असा सवालही मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला.

### वर्ष संपलं....

याप्रकरणी धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांच्यासह ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र जोपर्यंत या नराधमांना फाशीची शिक्षा होत नाही, तोपर्यंत सरपंचांना न्याय मिळणार नाही, अशी प्रतिक्रिया बंधु धनंजय देशमुख यांनी दिली आहे. ९ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आला, कौर्याची परिसीमा गाठणाऱ्या या क्रुर हत्येने संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती. आरोपींच्या अटकेसाठी राज्यभरात मोर्चे, आंदोलने झाली. याप्रकरणात एकूण आठ आरोपींचा समावेश होता, ज्यामध्ये सात जणांना अटक करण्यात आली आहे. वाल्मीक कराड, विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतिक घुले, जयराम चाटे, सुधीर सांगळे अशी अटकेत असलेल्यांची नावे आहेत, तर कृष्णा आंधळे अद्यापही फरार आहे.

धनंजय देशमुख रडले..सरपंच संतोष देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज मस्सजोगमध्ये कीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी दहा वाजल्यापासून कीर्तनाचा कार्यक्रम आहे. त्यानंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील देखील देशमुख कुटुंबाची भेट घेणार आहेत. दिवसभरात जिल्ह्यातील अनेक नेते मस्साजोग ला भेट देणार आहेत. माध्यमांशी बोलताना संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांना अश्रु अनावर झाले. आमचा निष्पाप माणूस गेला आहे. त्याच कुटुंब उघड्यावर पडलं असेल याविषयी खंत व्यक्त करण्यापेक्षा २२ ,२५ गुन्हे असलेला कुख्यात आरोपीची आठवण येणं म्हणजे जिल्ह्याच दुर्दैव आहे, असं म्हणत त्यांनी मंत्री धनंजय मुंडेंवर निशाणा साधला. तसेच जोपर्यंत सगळ्या

◆ पान ९ वरून पुढे...

आरोपींना फाशीची शिक्षा मिळत नाही तोपर्यंत लढत राहणार आहे, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

### आरक्षणाच्या तिढ्यामुळे...

असे सुप्रीम कोर्टाने सांगितले. यावेळी मात्र ५० टक्के आरक्षणाची मर्यादा न ओलांडण्याची अट सरन्यायाधीशांनी घातली. त्यामुळे आरक्षणाची मर्यादा पार केलेल्या १७ जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाचे प्रमाण कमी करूनच निवडणुका घेण्यावर निवडणूक आयोग विचार सध्या करत असल्याची माहिती समोर आली आहे.सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर ५० टक्के आरक्षणाचा प्रश्न नसलेल्या १५ जिल्हा परिषदांमध्ये आधी निवडणुका घेण्यात येतील. तर उर्वरित जिल्ह्यांमध्ये नंतर अशा दोन टप्प्यांमध्ये निवडणुका घेतल्या जाणार असल्याचे सांगितले जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणासंदर्भातील सरन्यायाधीश सूर्य कांत आणि जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने अधिसूचना काढलेल्या २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुकांना स्थगिती न दिल्यामुळे ठरल्याप्रमाणे या निवडणुका होतील. निवडणुका अडचणीत आलेल्या १७ जिल्हा परिषदांमध्ये नंदूरबार, पालघर, गडचिरोली, धुळे, नाशिक, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, नागपूर, अकोला, ठाणे, वाशिम, नांदेड, जळगाव, हिंगोली, वर्धा आणि बुलडाणा यांचा समावेश आहे. या सर्व जिल्हा परिषदांची निवडणूक दुसऱ्या टप्पात होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगाने ३२ जिल्हा परिषदा, ३३६ पंचायत समित्या व २९ महापालिकांमधील निवडणुकीची अधिसूचना अजून काढलेली नाही. मात्र त्याबाबत निवडणूक आयोगानेच निर्णय घ्यावा, अशी मोकळीक सरन्यायाधीशांनी दिली.

### 'प्रियकर मृत्यूनंतरही...

सक्षमला बहिणीशी बोलू नको, असे बजावले होते. मात्र, गुरुवारी सायंकाळी मुलीचे वडील गजानन मामीलवाड, भाऊ साहिल मामीलवाड, हिमेश मामीलवाड यांनी इतर साथीदारांच्या मदतीने सक्षमला बेदम मारहाण केली. त्यानंतर गोळी झाडून आणि डोक्यात फरशी घालून त्याची हत्या केली. मयत सक्षम आणि आरोपी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असल्याचं सांगितलं जात आहे. मृताच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून इतवारा पोलिसांनी मुलीचे आई-वडील, दोन भाऊ आणि इतर चौघांविरुद्ध खुनाचा आणि अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी अवघ्या बारा तासांत सर्व आरोपींना अटक केली. धक्कादायक बाब म्हणजे, हत्येच्या दोन तास आधी मुलीची आई जयश्री मामीलवाड मयताच्या घरी जाऊन धमकी देऊन आल्याची चर्चा आहे. प्रियकराच्या हत्येनंतर आचल थेट सक्षमच्या घरी पोहोचली. सक्षमचा मृतदेह घरी आणताच तिने आक्रोश केला. अंत्यविधीपूर्वी तिने स्वत:ला हळद लावून घेतली, कपाळावर कुंकू आणि सिंदूर भरला. सक्षमलाही हळद लावण्यात आली. हा प्रसंग पाहून उपस्थित सर्वजणांचाच थरकाप उडाला. माझ्या आई-वडिलांना आणि भावाला फाशी द्या, अशी मागणी आचलने केली आहे. वडील आणि भावांनी माझ्या प्रियकराला मारलं आणि पण तो मरून जिंकला आहे आणि माझ्या कुटुंबातील लोक हरले आहेत, असं आचलने म्हटलं आहे.

### ऊस दर...

कोणताही निष्कर्ष निघाला नसल्याने ऊस आंदोलन चिघळले आहे. बीड जिल्ह्यात शुक्रवारी शेकडो ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी वाहनांच्या ताफ्याद्वारे जिल्ह्यातील ओंकार शुगर्स पांगरी, अंबा साखर अंबाजोगाई, येडेश्वरी शुगर्स केज, गंगा माऊली शुगर्स केज या ठिकाणी ल शेतकरी समितीने भेटी

◆ पान ९ वरून पुढे...

देऊन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात केंद्र सरकारने ऊसासाठी प्रत्येक टनासाठी ३ हजार ५५५ रुपये दर १०.२५ रिकव्हरीला जाहीर केला आहे. आपणाकडे ११ किंवा त्यापेक्षा जास्त सरासरी रिकव्हरी लागत आहे, असे किसान सभेचे जिल्हाध्यक्ष ड. अजय बुरांडे यांनी सांगितले. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च लक्षात घेता प्रती टन ३ हजार रू. पहिली उचल तर ४ हजार रु. अंतिम दर मिळाला पाहीजे ही मागणी निवेदने करून केली. याबाबत जिल्हाधिकारी, बीड व साखर सहसंचालक छ. संभाजीनगर विभाग यांना देखील कळवण्यात आले आहे, असे ड. बुरांडे म्हणाले. ऊस उत्पादक संयुक्त कृती समितीने सुरू केलेल्या या आंदोलनास विविध ऊस तोड कामगार संघटना, विविध गावातील ग्राम पंचायत, सेवा सहकारी सोसायटी यांनी ठराव मंजूर करत पाठिंबा दिला असून ऊस प्रश्नी पेटलेले हे आंदोलनाबाबत साखर कारखानदारांनी सकारात्मक प्रतिसाद न दिल्यास हे आंदोलन यापेक्षा अधिक तीव्र स्वरूप घेऊन जन आंदोलन होईल असे कृती समितीकडून सांगण्यात येत आहे.

### बीड जिल्ह्यात...

तातडीने सखोल चौकशी व दोषींवरील कारवाईची मागणी करण्यात आली आहे. काम सुरू होण्यापूर्वीच टक्केवारीची मागणी- अनेक विभागांमध्ये प्रत्यक्ष काम सुरू होण्यापूर्वीच ठेकेदारांकडून टक्केवारीची मागणी केली जाते, तसेच बिले काढताना ही रक्कम देणे अनिवार्य केल्याचे अनेक गुत्तेदार सांगतात. त्यामुळे प्रकल्पाचा खर्च ‘टक्केवारी भरपाई’साठी कमी केला जातो आणि त्याचा थेट परिणाम निकृष्ट साहित्य, कमी मनुष्यबळ, आणि तांत्रिक निकषांचे उल्लंघन अशा स्वरूपात दिसतो. परिणामी कामे वेळेत न होता अपूर्ण अवस्थेतच राहतात. दर्जाहीन आणि कागदोपत्री ‘पूर्ण’ कामांचा धंदा- अनेक योजनांमध्ये वास्तव स्थिती वेगळी आणि कागदोपत्री स्थिती वेगळी असल्याचे आढळते.कामे कागदोपत्री पूर्ण दाखवणे. मोजमाप पुस्तिकांमध्ये चुकीची नोंद. अपूर्ण किंवा निकृष्ट कामांनाही बिल मंजुरी. PWD शासन नियमावलींचे उल्लंघन या सर्व गोष्टींमुळे संपूर्ण यंत्रणेतील पारदर्शकतेचा अभाव ठळकपणे दिसतो.

जनतेला लाभ न मिळणारी अपूर्ण कामे-करदात्यांच्या पैशातून राबविल्या जाणाऱ्या योजना प्रत्यक्षात सामान्य नागरिकांना अपेक्षित लाभ देण्यात अपयशी ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अपूर्ण नाल्या, उखडलेले रस्ते, दर्जाहीन बांधकामे, अपूर्ण सुविधा-अशा प्रकारची उदाहरणे नागरिकांचा संताप वाढवतात. कायद्याचे नियम धाब्यावर- शासन मार्गदर्शनानुसार कोणत्याही कामासाठी खालील प्रक्रिया बंधनकारक असते: गुणवत्ता तपासणी (Quality Inspection), तांत्रिक मान्यता (Technical Sanction), मोजमाप पुस्तिका (MB), लेखापरीक्षण (Audit), उत्तरदायित्व (Accountability), मात्र टक्केवारीच्या प्रथेमुळे या प्रक्रियांना बगल देण्याची शक्यता सातत्याने पुढे येत आहे. तक्रारींकडे प्रशासनाचे दुर्लक्ष- निकृष्ट आणि अपूर्ण कामांविरोधात होत असलेल्या तक्रारींकडे संबंधित विभाग जाणूनबुजून दुर्लक्ष करतात. अनेकदा तक्रारदारांनाच त्रास सहन करावा लागतो, अशीही गंभीर स्थिती निर्माण होते. सामाजिक कार्यकर्त्यांच्या शासनाकडे प्रमुख मागण्या-१) टक्केवारी व्यवहारांबाबत स्वतंत्र चौकशी २) सर्व प्रकल्पांचे तांत्रिक व वित्तीय ऑडिट ३) अपूर्ण व दर्जाहीन कामांचे स्थळनिरीक्षण ४) दोषी अधिकारी, कर्मचारी व ठेकेदारांवर कठोर कारवाई टक्केवारी थांबली तरच गुणवत्तापूर्ण कामे होतील - नागरिकांचे मत- नागरिकांचे स्पष्ट मत असे आहे की, प्रशासनातील टक्केवारीची प्रथा बंद झाली तरच विकासकामांची गुणवत्ता सुधारेल, आणि सार्वजनिक निधीचा योग्य, पारदर्शक आणि जनहितकारी उपयोग होऊ शकतो.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural ) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ऊस दरवाढीबाबत युवा शेतकरी संघर्ष समितीच्या आंदोलनास सोन्नाथाडी ग्रामपंचायतीचा एकमुखी पाठिंबा: सरपंच विनय डक

**माजलगाव । प्रतिनिधी**

सद्या शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेला ऊस दरवाढ संदर्भात त्यांना समर्थ देण्यासाठी तालुक्यातील सोन्नाथडी ग्रामपंचायत ने एकमुखी पाठिंबा दिला असल्याचे उपविभागीय अधिकारी यांना कळवले सल्याचे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक आबा डक व सरपंच विनय भैया डक यांनी सांगितले. बीड जिल्ह्यात युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने ऊस दरवाढीच्या मागणीसंदर्भात सुरु असलेल्या आंदोलनास सोन्नाथाडी ग्रामपंचायत बहुमताने पाठिंबा देत आहे असे आपणांस नम्र विनंतीपूर्वक कळिवण्यात



येते. सद्यस्थितीत ऊस उत्पादनाचा खर्च अत्यंत वाढलेला असताना, कारखानदारांकडून कोणताही दर जाहीर करण्यात आलेला नाही. याचा तीव्र निषेध सोन्नाथाडी ग्रामपंचायत व्यक्त करते. युवा शेतकरी संघर्ष समितीने मांडलेल्या ऊसाची पहिली ३,००० रुपये व अंतिम बिल ४,००० रुपये या योग्य व न्याय मागण्यांचे आम्ही एकमुखी समर्थन करीत आहोत. वरील मागण्यांवर समाधानकारक तोडगा निघत नाही तोपर्यंत ऊसतोड बंद, ऊस वाहतूक बंद आणि क्रशिंग बंद या आंदोलनात्मक कृतीस सोन्नाथाडी ग्रामपंचायत बहुमत्ताने पाठिंबा जाहीर करते. म्हणूनच आपण या गंभीर आणि तातडीच्या प्रश्नावर त्वरित मध्यस्थी करून शेतकऱ्यांच्या मागण्या निकाली काढाव्यात अशी विनंती ग्रामपंचायत सोन्नाथडी यांनी दि २९ रोजी येथील उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे निवेदनावर गावातील मुंबई बाजार समितीचे सभापती तथा सोसायटीचे व्ह. चेरमन अशोक आबा डक, सरपंच विनय भैया डक, अशाबाई वाघमारे ,बंडू शिंदे, जयश्री गोटे, अशामती पवार, उर्मिला डक, भगवान कांबळे ,पांडुरंग वक्ते संतोष देशमुख , रघुनाथ डाके, गिन्यांनदेव वाघमारे ,जाकिराम पवार, महादेव डाके, ज्ञानोबा पवार, महादेव डाके, विष्णूपंत गोरे, अशोक शिंदे ,पांडुरंग पावर व वैजनाथ पवार आदी सह गावातील नागरिकांच्या स्वाक्षरी आहेत.

# सीसीआय कापूस खरेदीत शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवा

## शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात सुरू असलेल्या कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया मार्फत कापूस खरेदी प्रक्रियेत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडथळा, अडवणूक किंवा पिळवणूक होऊ नये, यासाठी शिवसेना जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देत निवेदन सुपूर्द केले. सध्या बीड विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्यातील विविध केंद्रांवर सीसीआयची खरेदी प्रक्रिया सुरू आहे. मात्र, काही खरेदी केंद्रांहून शेतकऱ्यांकडून अनावश्यक विलंब, लांब प्रतीक्षा, गुणवत्तेच्या कारणावरून अनुचित कपात, ऑनलाइन नोंदणी आणि स्लॉट बुकिंगमधील तांत्रिक अडचणी, तसेच या कारणावर खरेदी नाकारल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्यांना उत्पादनाचा योग्य मोबदला मिळणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे.



खरेदी प्रक्रियेत अन्याय किंवा अडथळे निर्माण होत असतील, तर ते तातडीने दूर केले पाहिजेत, असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी निवेदनात नमूद केले. निवेदनात अनिलदादा जगताप यांनी खरेदी प्रक्रिया पारदर्शक व शेतकरी-हितकारक करण्यासाठी काही प्रमुख मागण्या जिल्हाधिकाऱ्यांकडे मांडल्या आहेत. सर्व सीसीआय केंद्रांवर देखरेख वाढवून शेतकऱ्यांना अनावश्यक अडवणूक रोखावी, गुणवत्तेनुसार दर कपात केल्यास त्याची कारणमीमांसा लेखी स्वरूपात शेतकऱ्यांना द्यावी, ऑनलाइन नोंदणी, स्लॉट बुकिंग, तोलमापन व बिलिंग प्रक्रियेत तांत्रिक कारणे दाखवत होणारा त्रास तातडीने थांबवावा, शेतकऱ्यांसाठी शेड, पिण्याचे पाणी, बसण्याची सोय, स्वतंत्र रांगा अशा मूलभूत सुविधा उपलब्ध कराव्यात. दैनंदिन खरेदीचे निरीक्षण अहवाल जिल्हास्तरावर पुनरावलोकनासाठी सादर करावेत. शेतकऱ्यांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाहीसाठी विशेष पथक नियुक्त करावे. या मागण्यांवर जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन आवश्यक कार्यवाही केली जाईल, अशी अपेक्षा अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केली. जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि खरेदी प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व न्याय्य पद्धतीने राबवावी, अशी मागणी या निवेदनातून पुढे आली आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त टूर

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून पर्यटन संचालनालयामार्फत दि. ३ ते ५ डिसेंबर २०२५ रोजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट'चे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईतील चैत्यभूमी येथे भेट देणारे पर्यटक तसेच अनुयायींसाठी टूर सर्किट निःशुल्क असणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रेरणादायी महान कार्य, त्यांचे जीवनचरित्र, विचार पर्यटक व नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा या टूर सर्कीटचा मुख्य उद्देश आहे. पर्यटकांनी या पर्यटन सर्किटचा लाभ घ्यावा, असे आवाहन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले आहे.




*स्व. संतोष अण्णा देशमुख यांना भावपूर्ण आदरांजली बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष अण्णा देशमुख यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त मस्साजोग येथे माजी विरोधी पक्षनेते तथा बीड जिल्हा संपर्क नेते अंबादासजी दानवे साहेब यांच्या समवेत जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर व माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी उपस्थित राहुन संतोष आण्णा देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी जिल्हाप्रमुख कुंडलिक बापू खांडे ,माजी जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे,युवासेना जिल्हा युवा अधिकारी अभिषेकजी दिवे सह बीड जिल्हा शिवसेनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. -परमेश्वर सातपुते सर (शिवसेना माजी जिल्हाप्रमुख बीड)*

# शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना शिक्षित, दीक्षित आणि योग्य नागरिक बनवावे

## • राज्यपाल आचार्य देवव्रत

**रायगड । प्रतिनिधी**

आधुनिक काळात शिक्षकांना विद्यार्थी घडवणे आव्हानात्मक झाले आहे. आजची मुले स्मार्ट आहे त्यामुळे त्यांना शिकवताना शिक्षकांना अधिक स्मार्टनेस दाखवावा लागेल. मुलांना रागावण्याचे किंवा अपमानित



करण्याचे युग गेले आहे, असे सांगताना शैक्षणिक संस्थांनी शिक्षित, दीक्षित आणि उत्तम नागरिक घडवावे, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.

राज्यपाल देवव्रत यांचा आज देशभरातील डीएव्ही महाविद्यालय शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापन समितीच्या वतीने महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल उलवे येथील भूमिपुत्र सभागृह येथे सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. राज्यपाल देवव्रत हे डीएव्ही संस्थेचे माजी विद्यार्थी असून ते कुरुक्षेत्र हरियाणा येथे निवासी गुरुकुल चालवतात. आजच्या शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांना माहिती मिळत आहे, परंतु जीवनाचे उद्दिष्ट सांगितले जात नाही. त्यामुळे शिक्षण संस्थांमधून अपूर्ण व्यक्तिमत्त्व निर्माण होत आहेत, असे राज्यपालांनी सांगितले. लहान मुले शिक्षकांचे आचरण विचरण पाहत असतात, त्यामुळे शिक्षकांनी आपल्या आचरणातून मुलांपुढे आदर्श ठेवावेत तसेच मुलांना भारतीय जीवन मूल्यांशी जोडावे असे राज्यपालांनी सांगितले. आपण कुरुक्षेत्र येथे अवघ्या सात मुलांना घेऊन गुरुकुल सुरु केले. आज मात्र तेथे हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असून हे गुरुकुल पाहण्यासाठी देशभरातून लोक येतात, असे राज्यपालांनी सांगितले. डीएव्ही संस्थेच्या वतीने झालेला सत्कार हा आपल्याच कुटुंबाकडून झालेला सत्कार आहे, असे सांगताना आपल्या जडणघडणीत महर्षी दयानंद, आर्य समाज व डीएव्ही संस्थेचे मोठे योगदान आहे, असे राज्यपालांनी सांगितले. शैक्षणिक क्षेत्रात डीएव्ही संस्थांनी जितके व्यापक योगदान दिले आहे तितके क्वचितच इतर संस्थांनी दिले आहे असे राज्यपालांनी सांगितले.

# आध्यात्मिक उपासनेवर प्रकाश टाकणारी आत्मकथा : पंडितराव दौंड

## डॉ.गुट्टे महाराज लिखित 'अंगणातलं देऊळ' पुस्तकाचे उत्साहात प्रकाशन



**परळी । प्रतिनिधी**

डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज लिखित अंगणातलं देऊळ या आत्मचरित्राचा प्रकाशन सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या पुस्तकाचे प्रकाशन माजी मंत्री पंडितराव दौड यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र दिव्यांग मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, प्राचार्य डॉ. विश्वनाथ खेडकर, आदिनाथ गुट्टे, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते माधव मुंडे, वैद्यनाथ साखर कारखान्याचे संचालक संजय आघाव, परळी वकील संघाचे माजी अध्यक्ष अॅड. त्रिंबक गोलेर, मरळवाडीचे माजी सरपंच प्रभू आंधळे, हनुमंत गुट्टे, बाबुराव आघाव, दैनिक सोमेश्वर साथीचे संपादक बालाजी फड, तसेच दैनिक बातमीदारचे मुख्य संपादक महादेव गित्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रकाशनप्रसंगी बोलताना माजी मंत्री पंडितराव दौड म्हणाले, आध्यात्मिक उपासनेवर प्रकाश टाकणारी आत्मकथा म्हणजे अंगणातलं देऊळ होय. या पुस्तकातून स्वामीजींच्या जीवनप्रवासासोबतच घराघरांत रुजलेल्या संस्कारांची, श्रद्धेची आणि साधनेची मांडणी प्रभावीपणे झाली असून बाह्य दिखाव्यापेक्षा अंतःकरणातील भक्ती, साधेपणा आणि सातत्यपूर्ण उपासनेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे, असे त्यांनी सांगितले.

# कुंभमेळा प्राधिकरण आयुक्तांकडून गोदावरी तीरावरील घाटांची पाहणी

**नाशिक। प्रतिनिधी**

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त तथा सदस्य सचिव शेखर सिंह यांच्यासह महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी आज सकाळी गोदावरी नदीच्या काठावरील घाटांची पाहणी करून विविध सूचना केल्या.

आयुक्त श्री. सिंह यांनी रामकुंड परिसर, गांधी तलाव, पांडे मिठाई पूल, बालाजी कोठ, गणेशवाडी पूल, रामसेतू पूल, गाडगे महाराज पुलासह अमरधामपर्यंतच्या घाटाची पाहणी केली. यावेळी महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, महानगरपालिकेचे शहर अभियंता संजय अग्रवाल आदी उपस्थित होते. आयुक्त श्री. सिंह यांनी सांगितले की, आगामी कुंभमेळ्यासाठी साधू-महंतांसह देश- विदेशातून भाविक येणार



आहेत. त्यांच्या अमृत स्नानासाठी घाट सुरक्षित करावेत. त्यासाठी घाटांची दुरुस्ती करून आवश्यक तेथे कठडे बसवावेत. घाटांना जोडणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती करीत पायाभूत सोयीसुविधांचे बळकटीकरण करावे. भाविकांचे स्नान, वाहतूक, आपत्ती व्यवस्थापन, घाटांची क्षमता, पाण्याची खोली, विद्युतीकरण, आपत्कालिन मार्गांची पाहणी करावी. या सर्व सुविधा अद्ययावत कराव्यात, तसेच भाविकांना कुठलीही अडचण येणार नाही यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा वेळेत पूर्ण होतील याचे नियोजन करावे, अशाही सूचना आयुक्त श्री. सिंह यांनी दिल्या. आयुक्त श्रीमती खत्री यांनी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेतर्फे सुरू असलेल्या विविध पायाभूत सोयीसुविधांची माहिती दिली, तर जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती शहाणे यांनी घाटांचे बांधकाम, दुरुस्ती याच्या नियोजनाची माहिती दिली.



*महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी रोजी मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव काठोडा मातोश्री कॅम्पस येथे ता.जि.बीड येथे ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यात आले. याठिकाणी रुग्णाचे सर्व उपचार मोफत करण्यात येत आहे.या ठिकाणी केले जाणारे उपचार( ओपीडी,आधुनिक वाफारा, सर्व प्रकारचे आयुर्वेदिक उपचार,रक्ततपासणी, सर्व प्रकारचे प्राथमिक उपचार व सर्व रूग्णांना औषध,गोळ्या मोफत दिले जातात.)याठिकाणी डॉ.स्नेहल यांच्या उपस्थितीत सर्व रूग्णांना सेवा पुरवली जाते. या ठिकाणी प्रमुख पाहुणे उपस्थित श्री दिलीप उत्तमराव पवार व आशा प्रभाकर आगे तसेच मातोश्री बहुउद्देशीये सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष छाया दिलीप पवार, उपाध्यक्ष विशाल नाना डोळस, सचिव तेजस दिलीप पवार, सदस्य तेजस्विनी दिलीप पवार व सर्व पदाधिकारी, गांवकरी या वेळी उपस्थित होते.*

# राजर्षी शाहू कन्या प्राथमिक विद्यालयात 'आनंद नगरी' उपक्रम उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

राजर्षी शाहू कन्या प्राथमिक विद्यालय, बीड येथे आज आनंद नगरी हा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष इंजी. बलभीमराव जाहेर पाटील, संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके, मुख्याध्यापक आर. टी. राऊत, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती आर. डी. लोखंडे, तसेच श्रीमती जी. डी. कदम, श्रीमती एम. एस. सोनवणे, श्रीमती आर. एस. रसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. उद्घाटनानंतर छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. या आनंद नगरीत एकूण १०५ स्टॉल्सची उभारणी करण्यात आली होती. प्रत्येक स्टॉलवर विद्यार्थिनी व पालकांनी मिळून साधे व घरगुती प्रकारचे विविध खाद्यपदार्थ आकर्षक मेनूसह ठेवले होते. यात पोहे, उपमा, शेवई, भेळ, लाडू, शिरा, थालीपीठ, सँडविच, इडली-चटणी, पुलाव, फराळाचे पदार्थ, थंड पेये, गोड पदार्थ, पास्ता, खारे शंकरपाळे, बाजरीची भाकरी-चटणी अशा अनेक पारंपरिक आणि चविष्ट पदार्थांचा समावेश होता.


## मा. अॅड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज अॅक्ट 2002 व अब्रिटेशन अॅन्ड कन्सिलेशन अॅक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 29/11/2025

अर्जदार : प्रियदर्शनी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. परळी, जैन कॉम्प्लेक्स, मोढा मार्केट, ता. परळी जि. बीड

**विरूद्ध — गैरअर्जदार**

1) लवाद अर्ज क्र. 01/2025 व 02/2025 1) जोशी नकुल नंदकिशोर 2) जोशी नंदकिशोर जगन्नाथ 3) जोशी वालीबाई नंदकिशोर सर्व रा. हितकर टी हाऊस जवळ, स्टेशन रोड, परळी वै ता. परळी वै जि. बीड

2) लवाद अर्ज क्र. 03/2025 व 04/2025 1) जोशी नंदकिशोर जगन्नाथ 2) जोशी नकुल नंदकिशोर 3) जोशी वालीबाई नंदकिशोर सर्व रा. हितकर टी हाऊस जवळ, स्टेशन रोड, परळी वै ता. परळी वै जि. बीड

3) क्र. 05/2025 1) जाधव बापुराव धोंडीराम रा. रेहाणा मस्जिद जवळ, बसवेश्वर कॉलनी, परळी वै जि. बीड 2) चव्हाण विजयकुमार मोकिंदा रा. व्यंकटेश नगर, गंगाखेड जि. परभणी 3) मुगळे करबसअप्पा शंकरराव रा. खडकपुरा, गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी

4) लवाद अर्ज क्र. 06/2025 1) डापकर महादेव उर्फ माधव हरिभाऊ रा. बेलंबा ता. परळी वै जि. बीड 2) गिरी दत्तात्रय अवधुतराव रा. संगम ता. परळी वै. जि. बीड 3) गायकवाड रत्नेश्वर नामदेव रा. गांधी मार्केट, परळी वै. ता. परळी वै. जि. बीड

( टीप : वरील प्रत्येक लवाद अर्जामध्ये क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपणा पैकी काहींनी घेऊन गैरहजर राहिलात. काहींनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 17/12/2025 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही, असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांनिशी दिली आहे.

अॅड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.







दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५ ● पान ४


# पंकजाताई मुंडे यांच्या सभेने गेवराईत कमळाचीच हवा

**• विकासाचे व्हिजन असलेल्या गिताभाभी पवार यांच्यासह भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणा**
**• पालकमंत्री असताना गेवराईला झुकते माप दिले ; भविष्यात कोणत्याही कामासाठी थेट पंतप्रधानापर्यंत जावू**

**गेवराई । प्रतिनिधी**

आपण पालकमंत्री असतांना गेवराईच्या विकासाला सातत्याने झुकते माप दिले. अनेक कामांसाठी लक्ष्मण पवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे गेवराईत मोठ्या प्रमाणात कामे झाली. भविष्यातही गेवराईच्या कोणत्याही कामांसाठी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पर्यंत आपण जावू, त्यासाठी आपण नगर पालिका निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारांना आणि नगराध्यक्ष पदासाठी उभे असलेल्या गिताभाभी पवार यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, सध्या घड्याळ कपाटात बंद करून ठेवा असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी काल गेवराईच्या सभेत केले. माजी खा. प्रितमताई मुंडे यांनीही यावेळी भुमिका स्पष्ट करतांना गेवराई तालुका आणि शहर सातत्याने मुंडे घराण्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. त्याच पध्दतीने आम्ही ही बाळराजे पवार आणि





**माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांनी देखील त्यांच्या खासदारकीच्या काळात लक्ष्मण पवार आणि बदामराव पंडित यांनी सातत्याने विकासाची कामे करून घेण्यासाठी प्रयत्न केल्याचे सांगितले. बाळराजे पवार यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे. त्यामुळे गेवराई शहराचा चेहरामोहरा आगामी काळात बदल्याशिवाय राहणार नाही असेही प्रितमताई मुंडे म्हणाल्या.**

बदामराव पंडित यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहु असे आश्वासन यावेळी प्रितमताई यांनी दिले. ना. पंकजाताई मुंडे यांच्या या सभेमुळे भाजपाच्या विजयावर एक प्रकारे शिक्कामोर्तबच झालं . पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भाषणामध्ये विकासाच्या मुद्दयाबरोबरच आगामी काळात करण्यात येणाऱ्या कामांचाही लेखा जोखा मतदारांसमोर मांडला. यावेळी माजी ▶ उर्वरित पान २ वर

# भाजपच्या संध्या मेंडकेना शहरात उत्तम प्रतिसाद

**टक्केवारी व भ्रष्टाचार मुक्त नगरपालिकेची अपील जनतेला भावली**



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव नगरपालिकेचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. सगळ्या पक्षांनी प्रचाराची सर्व तंत्र वापरले असून दोन राष्ट्रवादी मधील आरोप प्रत्यारोपांनी शहराचे राजकीय वातावरण दूषित झाले आहे. भाजपच्या शांत, शिस्तबद्ध प्रचाराने जनतेची मने जिंकून घेतली असून उमेदवार संध्या मेंडके यांना भरघोस प्रतिसाद मिळत आहे. माजलगाव नगरपालिकेच्या निवडणुकीत प्रचाराने वेग धरला आहे. प्रचारासाठी एक दिवस अधिक मिळाला आहे. नगरपालिका निवडणूक मुख्य तीन पक्षा मधे होत असून दोन राष्ट्रवादीतील व्यक्तिगत आरोप प्रत्यारोपांनी राजकीय वातावरण दूषित झाले आहे. जाहीर सभेतून अश्लील टीका टिपण्णी होत असल्याने माजलगावकर खास करून महिला दोन्ही राष्ट्रवादीच्या कॉर्नर ▶ उर्वरित पान २ वर

## राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त दीपक देशमुख, सौ. देशमुख यांनी केले अभिवादन !

**परळी । प्रतिनिधी**

शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या पक्ष प्रचार कार्यालयात दीपक देशमुख यांनी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन केले. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक रणधुमाळीचा प्रचार सुरू असताना, प्रचारास काही दिवस असून ,एवढ्या व्यस्ततेत त्यांनी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त त्यांना पक्ष प्रचार कार्यालयात अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संध्या दीपक देशमुख व माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ देशमुख तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



# गेवराईची राष्ट्रवादी पराभव समोर दिसू लागल्यामुळे बावचळली: अँड उध्दव रासकर

**गेवराई । प्रतिनिधी**

नगरपरिषद नगराध्यक्ष व नगरसेवकाच्या निवडणूक प्रचाराची भव्य व विजयी सभा नामदार पंकजताई मुंडे यांची झाली या सभेमध्ये नामदार पंकजाताई मुंडे यांनी नगराध्यक्षाचे उमेदवार गीता भाभी बाळराजे पवार व वीस सदस्यांच्या विजयाचा शिक्कामोर्तब केला भाजपाची ही भव्य दिव्य सभा पाहून गेवराई राष्ट्रवादी बावचळली आहे.

सभा झाल्यानंतर नामदार ताई साहेबांच्या भाषणामधील काही भाग कट करून सोशल मीडियावर अपप्रचार सुरू केला आहे ताई साहेबांनी भाषणामध्ये जनतेसमोर सांगितले की घड्याळाकडे लक्ष द्या मी घड्याळ काढून ठेवते तुम्ही पण दोन तारखेपर्यंत कपाटात



काढून ठेवा. यातील घड्याळाकडे लक्ष द्या एवढीच क्लिप कट करून सोशल मीडियावर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते अपप्रचार करत आहेत हा सगळा प्रकार हास्यास्पद आहे यातून राष्ट्रवादीचे नेते व कार्यकर्त्यांच्या बुद्धीची किव करावयासी वाटते. यातून निष्पन्न होते की ताईसाहेबां शिवाय गेवराई नगरपालिका निवडणूक होऊ शकत नाही व ज्यांच्या बाजूने नामदार पंकजाताईसाहेब मुंडे आहेत त्यांचा विजय ठरलेला आहे त्यामुळे जनतेची दिशाभूल करण्यासाठी आशा भाषणाचा काही भाग कट करून सोशल मीडिया टाकून मतदारांची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न राष्ट्रवादीचे नेते व कार्यकर्ते करत आहेत नगराध्यक्षाचे उमेदवार सौ गीता भाभी बाळराजे पवार प्रचंड मतांनी निवडून येणार आहेत यात तिळमात्र मात्र शंका नाही . पराभव समोर दिसू लागल्यामुळे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते बावचळले आहेत असे मत गेवराईभाजपाचे तालुकाध्यक्ष (प) अँड उध्दव रासकर यांनी व्यक्त केले आहे

# महिलांच्या सबलीकरणासाठी आयुष्य वाहिले ; आता गेवराईच्या व्यापक विकासासाठी तुमचा आशीर्वाद हवा : सौ. गीताभाभी पवार

**गेवराईत सर्वत्र कमळाच्या फुलाचाच सुगंध ; सौ.गीताभाभीची विजयी घोडदौड कायम**

**गेवराई । प्रतिनिधी**

पंधरा वर्षांपासून आम्ही नगरपरिषदेसाठी काम केले, मी महिलांसाठी लढले, बचत गटांना सक्षम केले. आता गेवराईच्या व्यापक विकासासाठी पुन्हा एकदा तुमच्या आशीर्वादाची गरज आहे, अशा भावनिक शब्दांत भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीता भाभी बाळराजे पवार यांनी गेवराईकरांना आवाहन केले.

गेवराई शहरातील विविध भागातील प्रचार बैठकीत त्यांनी



मतदारांशी संवाद साधला या प्रसंगी त्या बोलत होत्या. नगरपरिषदेत गेल्या दशकात काम करताना मिळालेल्या अनुभवाची आठवण करून देताना गीता भाभींनी सांगितले की, शहरात काम करताना आम्ही नगरपरिषद क्षेत्रातील ३५० बचत गटांना सक्षम केले. महिलांना आर्थिक बळकटी मिळावी म्हणून बचत गटांच्या माध्यमातून दहा कोटींची उलाढाल घडवून आणली. महिलांसाठी योगसाधना, दर तीन महिन्यांनी मोफत आरोग्य तपासणी ही असे सर्व उपक्रम ▶ उर्वरित पान २ वर

# बाळासाहेब गुंजाळांना लाडक्या बहिणीची साथ, पेठ बीडची निवडणूक महिलांनी हाती घेतली

**बीड । प्रतिनिधी**

बीडची नगर पालिका निवडून रंगात आली असून सर्वच पक्ष मोठ्या ताकतिने निवडणूकीच्या रिंगनात उतरले आहेत..अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाकडून लढणारे नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ यांना विजयी करण्यासाठी बीड शह्रातील पेठ बीड भाग म्हणजे वॉर्ड क्रमान्क् २१ ची निवडणूक आता महिलांनी हाती घेतली असून बाळासाहेब गुंजाळ आणी



पायल दत्ता जाधव यांना निवडून आण्यासाठी लाडक्या बहिणी आता प्रचारात् उतरल्या आहेत.. पेठ बीड भाग आणी नाळवंडी नाका परिसराचा विकास बाळासाहेब गुंजाळ यांच्या माध्यमातून झालेला आहे, हा भाग अगोदर ग्रामीण म्हणून ओळखला जायचा मात्र आता या भागात बाळासाहेब गुंजाळ यांनी विकास करून या वॉर्डाला स्मार्ट सिटी चा दर्जा दिला. या ▶ उर्वरित पान २ वर

# बीडचा सामान्य मतदार आमच्यासोबत, त्यामुळे विजयाची तुतारी वाजणारच : आ.संदीप क्षीरसागर

**मतदारांच्या प्रतिसादाने, कॉर्नर सभांना विराट सभेचे स्वरुप**

**बीड । प्रतिनिधी**

सातत्याने आम्ही लोकांच्या अडीअडचणी सोडवितो व लोकांच्या संपर्कात असतो. यामुळे सामान्य मतदार आमच्या सोबत असल्याने विजयाची तुतारी वाजणारच असे आ.संदीप क्षीरसागर यांनी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे आणि प्रभाग क्रमांक १, ३, ४ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि.२९) सायंकाळी शहरातील चक्रधर नगर, मातोश्री मंगल कार्यालय, विठ्ठल मंदिर चौक पेठ बीड येथे प्रचारार्थ आयोजित कॉर्नर



बैठकांत प्रतिपादन केले. या सभेला मतदारांची आलोट गर्दी दिसून आल्याने बीड करांच ठरलं, तुतारी वाजणारच अशी चर्चा सुरू झाली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आघाडीच्या बीड नगराध्यक्षपदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे यांच्या व प्रभाग १ मध्ये बबीता सुधाकर जाधव, अशोक मारूती काळे यांच्या प्रचारार्थ ▶ उर्वरित पान २ वर

# गेवराई शहरातील म्हाडा कॉलनीवाशीयाना मालकी हक्काचा पीटीआर देऊ: अमरसिंह पंडित

**राष्ट्रवादीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित कॉर्नर बैठकीत केले मार्गदर्शन**

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई नगर परिषद सार्वत्रिक निवडणूकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ शितलताई महेश दाभाडे व प्रभाग एक मधील महिला उमेदवार सौ. गंगासागर विठ्ठल पवार व भास्कर भिकाजी काकडे यांच्या प्रचारार्थ माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत कॉर्नर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना अमरसिंह पंडित



म्हणाले की, गेवराई शहरातील म्हाडा कॉलनीवाशीयाना मालकी हक्काचा पीटीआर देऊ त्यासाठी नगर परिषदेची सत्ता आमच्या हाती द्या, आम्ही दिलेले शब्द पुर्ण करु असेही ते यावेळी म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ शितलताई महेश दाभाडे व प्रभाग एक मधील महिला उमेदवार सौ. गंगासागर विठ्ठल पवार व भास्कर भिकाजी काकडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली म्हाडा कॉलनी मध्ये कॉर्नर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अमरसिंह पंडित पुढे बोलताना म्हणाले की, म्हाडा कॉलनीच्या विकासाचा अनुशेष पूर्ण करण्यासाठी या प्रभागातील रस्ते नाल्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावू. म्हाडा कॉलनीतील मालकी हक्काचा पीटीआर मिळवून देण्याचे काम करू त्यासाठी येणाऱ्या २ डिसेंबर रोजी ▶ उर्वरित पान २ वर